# 'आरंभि स्मरितो'ला रसिकांची दाद

## संगीतसूर्य केशवराव भोसले स्मृती महोत्सव; आज महोत्सवाची सांगता

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या जयंतीनिमित्त रंगलेल्या स्मृती महोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे. आज रंगलेल्या 'आरंभि स्मरितो पाय तुझे' या संगीत नाटकासह 'लोककलावंतांच्या नजरेतील केशवराव' या कार्यक्रमालाही रसिकांनी मोठी हजेरी लावली. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने महोत्सवाचे आयोजन केले आहे. उद्या (बुधवारी) महोत्सवाची सांगता होणार आहे.

दरम्यान, केशवराव भोसले यांच्या जयंतीदिनी आज अखिल भारतीय नाट्य परिषदेतर्फे ज्येष्ठ रंगकर्मी अनिल सडोलीकर यांचा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरव झाला. यावेळी नाट्य परिषदेचे अध्यक्ष आनंद कुलकर्णी, संचालनालयाच्या सहाय्यक संचालक सुनीता अस्वले आदी उपस्थित होते.

मराठी नाटकाची परंपरा नेटाने पुढे नेण्यासाठी सर्वच पातळीवर प्रयत्न आवश्यक असून, शिवाजी विद्यापीठाकडून आवश्यक सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिली. अनिल सडोलीकर यांनी यावेळी आजवरच्या रंगभूमीवरील प्रवास उलगडला. प्रमुख कार्यवाह गिरीश महाजन यांनी परिषदेच्या कामाची माहिती दिली. खजानीस प्रा. शशिकांत चौधरी यांनी राष्ट्रीय नाट्यलेखन स्पर्धेची माहिती दिली.




**कोल्हापूर : संगीतसूर्य केशवराव भोसले यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे ज्येष्ठ रंगकर्मी अनिल सडोलीकर यांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाला. यावेळी आनंद कुलकर्णी, सुनीता अस्वले. दुसऱ्या छायाचित्रात संगीतसूर्य केशवराव भोसले स्मृती महोत्सवात मंगळवारी रंगलेल्या 'आरंभी स्मरितो पाय तुझे' नाटकातील एक प्रसंग.**

'आरंभि स्मरितो पाय तुझे' या नाटकानंतर 'लोककलावंतांच्या नजरेतील केशवराव' हा कार्यक्रम झाला. लोकशाहीर प्रा. श्याम वानखेडे, शिवशाहीर डॉ. शिवराज शिंदे आणि सहकलाकारांचे सादरीकरण होते.

दरम्यान, महोत्सवात उद्या (बुधवारी) केशवराव भोसले यांच्या नाट्यमय आठवणी आणि गानशैलीवर आधारित 'संगीत सूर्यदर्शन' हा कार्यक्रम सायंकाळी सहाला होईल. त्यानंतर सात वाजता जगद्गुरू संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक भेटीवर आधारित 'संगीत संत तुकाराम' या नाटकाचा प्रयोग होईल. सर्व कार्यक्रमांना विनामूल्य प्रवेश असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
10 AUG 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भविष्यातील शिक्षणात आव्हानांबरोबरच संधीची उपलब्धता : कुलगुरू डॉ. शिर्के

## डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिन कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, नामदेवराव कांबळे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

२१ शतकातील विद्यार्थ्यांना विचार प्रक्रिया विकसित करण्यासाठी वाव दिला पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील आव्हानांना स्वीकारण्यासाठी सकारात्मक दृष्टीची आवश्यकता आहे. हे धोरण राबवताना शिक्षक सजग असणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवताना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने पथदर्शकाची भूमिका निभवावी, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३५ व्या स्मृतिदिन कार्यक्रमप्रसंगी 'भविष्यातील शिक्षण : संधी आणि आव्हाने' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे म्हणाले, शिक्षणातील संधी व आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. स्मृतिदिना निमित्ताने शिक्षकांनी बापूजींच्या विचार, कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थी घडवावेत. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. सूत्रसंचालन प्र.प्राचार्य प्रा.डॉ. महेश गायकवाड, प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आभार मानले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सहसचिव (अर्थ) मा. एस. एम. गवळी, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ.आर. आर. कुंभार उपस्थित होते.

10 AUG 2022

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणणे गरजेचे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : कॉमर्स कॉलेजमध्ये पुष्पा देशपांडे-राशिवडेकर सभागृहाचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत परिघावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणणे गरजेचे आहे. त्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये नवीन बांधलेल्या कै. पुष्पा देशपांडे-राशिवडेकर सभागृहाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम होत्या.



**कोल्हापूर : कॉमर्स कॉलेजमध्ये कै. पुष्पा देशपांडे-राशिवडेकर सभागृहाचे फीत कापून उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत रजनीताई मगदूम आदी मान्यवर.**

डॉ. शिर्के म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरण हे शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांना स्वयंविकासाचे अवकाश खुले करून देणारे आहे. या शैक्षणिक धोरणातील ॲकॅडेमिक बँक क्रेडिट सिस्टीम विद्यार्थ्यांच्या विकासाला गती देणारी आहे. सध्या विद्यार्थ्यांवर असणारी प्रवेशाची बंधने या धोरणाने कमी केली आहेत. रजनीताई मगदूम यांनी पद्मश्री डॉ. आण्णांच्या दूरदृष्टीस अनुसरून महाविद्यालय विकास करत असल्याचे सांगितले. सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम म्हणाले, सध्याचे शैक्षणिक बदल सकारात्मकतेने स्वीकारावेत. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी सभागृहाचे देणगीदार अचल कुलकर्णी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे संचालक ॲड. वैभव पेडणेकर, ॲड. अमित बाडकर, प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे, प्राचार्य डॉ. नारायणन, कॉन्ट्रॅक्टर व्ही. बी. पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अश्विनी मगदूम यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. बी. टी. नाईक यांनी मानले. कॉमर्स कॉलेजच्या माजी प्राध्यापिका पुष्पा देशपांडे-राशिवडेकर यांच्या स्मरणार्थ त्यांचे आत्तेभाऊ अचल कुलकर्णी यांनी २५ लाख रुपयांची देणगी कौन्सिल ऑफ एज्युकेशनला दिली. या देणगीमधून पुष्पा देशपांडे-राशिवडेकर यांच्या नावे अत्याधुनिक सभागृह बांधण्यात आले. त्याबद्दल कुलकर्णी कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला.

10 AUG 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विज्ञानाच्या विश्वात

डॉ. व्ही.एन. शिंदे

# काय भुललासी वरलिया रंगा!

मागच्या आठवड्यात पुण्याला जाताना मित्र भेटला. गप्पांमध्ये त्याने पुण्याजवळच्या निसर्गाचे भन्नाट कौतुक केले. तो सांगत होता, 'पुण्याच्या बाहेर कोणत्याही बाजूला गेलास, तरी मनमोहक दृष्य दिसते. रस्त्याकडेला सर्वत्र पिवळी, भगवी, लाल, केशरी फुले फुललेली असतात. पावसाळा संपून गेल्यानंतर १५ दिवस ते महिनाभर हा फुलोत्सव असतो. खूप मजा येते. कशाला कास हवे? खूप सुंदर दिसते.' त्याचा उत्साह पाहून निमूटपणे बराच वेळ ऐकून घेतले. नंतर त्याला विचारले, 'तुला या फुलांची काय माहिती आहे? ही कोणती फुले आहेत? त्यांचे फायदे, तोटे काय? काही माहिती आहे का?' त्याने मलाच विचारले, 'कशाला हवेत प्रश्न आणि कशाला हवीत उत्तरे? फुललेली झाडे सुंदर दिसतात. आठवड्याचा थकवा घालवतात, एवढं बस्स झालं. मस्त यावं, फोटो काढावेत, फेसबुक, व्हॉट्सअॅप स्टेटसला टाकावेत, प्रसन्न होऊन परत जावे.' मी त्याला उत्तरे देण्याच्या भानगडीत पडलो नाही. तो स्वतःला 'प्रॅक्टिकल' जीवन जगणारा मानतो. त्याला तिथेच उत्तर देऊन निरूत्साही करायचे नव्हते. मी गप्प राहिलो, तरी अस्वस्थता जात नव्हती. ही वेळ या विषयावर लेखन करण्यास सुयोग्य वेळ असल्याने आणि विषय छेडला गेल्याने लिहावेसे वाटले.

मित्रालाच नव्हे, तर अनेकांना पुण्याभोवती विळखा घालून बसलेल्या या फुलांची भुरळ पडते. त्या बहुतांश विदेशी वनस्पती आहेत. यामध्ये प्रामुख्याने कॉस्मॉस मोठ्या प्रमाणात आहे. ती रोपे फुलल्यानंतर सुंदरच दिसतात. पिवळ्या, केशरी, गुलाबी, निळ्या रंगांचे कॉस्मॉस सर्वांना आवडावे असेच फुल आहे. कॉस्मॉसची उंची तीन-चार फुटांपासून सात-आठ फुटांपर्यंत वाढते. टोकाला फांद्या फुटतात. फांद्यांच्या टोकाला फुले पंचरंगी झेंडूप्रमाणे दिसतात. अनेकजण याला मखमलीची फुले समजतात. पाने मखमलीसारखी संयुक्त असल्याने कदाचित हा समज असावा. पावसाळा संपला की यांचा बहर संपतो. डिसेंबर-जानेवारीपर्यंत निव्वळ वाळलेल्या काड्या राहतात. परिसर भकास बनतो. यांचा बीजप्रसार इतका वेगाने होतो की, जेथे एक रोप दिसते, तेथे काही वर्षांत मूळ गवत पूर्ण नामशेष होते.

दुसरी वनस्पती अशीच मनात भरते, ती म्हणजे मेक्सिकन सनफ्लॉवर. यालाही गडद लाल, पिवळ्या, भगव्या रंगाची खूप सुंदर फुले येतात. ही रोपे खूप जोमाने वाढतात. पाने पसरट असतात. सूर्यफुलासारखे रोप वाढते. पाने साधी, पसरट, सूर्यफुलांसारखी असतात. यालाही टोकाला फांद्या फुटून, फांद्याच्या टोकाला फुले येतात. ही फुलेही आता अनेक ठिकाणी दिसू लागली आहेत. रोपे अगदी १५ ते १६ फुटांपर्यंत वाढतात. बीजप्रसार वेगाने होतो. याच्याखालीही गवत येत नाही.

आणखी एक विदेशी वनस्पती आहे. आपल्याकडे अनेक वर्षांपासून दिसते. तिचाही प्रसार वेगाने होतो, ती म्हणजे घाणेरी. अनेकांना घाणेरी आपली वाटते. मात्र, ती विदेशी आहे. घाणेरी झुडुपवर्गीय आहे. घाणेरीची वाढही आजूबाजूच्या परिस्थितीनुसार सात-आठ फुटांपासून १५ ते २० फुटांपर्यंत झालेली आढळते. घाणेरीची फुलेही आकर्षक असतात. मात्र, आजूबाजूची जैवविविधता संपवते. घाणेरीप्रमाणेच अस्सल देशी नाव घेत वाढू लागलेली आणखी एक वनस्पती म्हणजे रानमोडी. रानमोडीची पाने तुळशीच्या मोठ्या पानांसारखी दिसतात. एकदा उगवली तर लवकर हलायचे नाव घेत नाही. घाणेरी मुळांसकट उपटली तरी जाते; रानमोडी उपटायला बरेच कष्ट पडतात.

या चारही वनस्पती वेगाने वाढतात, त्यांचा वेगाने प्रसार होतो. आपल्या आजूबाजूच्या भागात त्या गवतालासुद्धा वाढू देत नाहीत. त्यांना कोणताही प्राणी खात नाही. फुलांवर कोणतेही कीटक येत नाहीत. त्यामुळे त्यांचा बीजप्रसार वेगाने होतो. या वनस्पती खात नसल्याने आणि खाण्यायोग्य वनस्पतींना ही तणे वाढू देत नसल्याने, या भागातील कीटक, पक्षी आणि प्राणी त्या भागातून स्थलांतरित होतात. पूर्वी कोणी तरी यांच्या बिया टाकल्या असाव्यात. त्या रस्त्याकडेला फुलून रस्त्याच्या आजूबाजूला सुंदर दिसायचे. आता कॉस्मॉस आणि मेक्सिकन सनफ्लॉवरने टेकड्या आणि डोंगररांगा व्यापायला सुरुवात केली आहे. शेताच्या बांधावर मोठ्या प्रमाणात वाढ व्हायला लागली आहे. पूर्वी या भागात आढळणारे गवत आता नाहिसे झाले आहे. परिणामी पूर्वी आढळणारे प्राणी त्या भागातून हद्दपार होत आहेत. या वनस्पतीतील घाणेरी निदान गवताला नाही, इतर झाडांना वाढू देते. कॉस्मॉस, मेक्सिकन सनफ्लॉवर आणि रानमोडी तर तेवढेही सौजन्य दाखवत नाहीत. या तणांचा ना मानवाला काही उपयोग, ना निसर्गातील अन्य घटकांना. कॉस्मॉस आणि मेक्सिकन सनफ्लॉवरवर तर मधमाशाही बसत नाहीत. या फुलांना गंध तर नाहीच, पण फुलांमध्ये पुष्परसही नसतो का? असा प्रश्न पडतो. पाने जनावरे खात नाहीत, फुले मध देत नाहीत. त्यापासून जळण मिळत नाही. अशा या वनस्पती बाहेरून आल्या आणि येथे राज्य करू लागल्या आहेत.

या वनस्पतींचा प्रसार रोखायचा असेल तर त्या उगवून आल्यानंतर त्यांचे समूळ उच्चाटन करणे आवश्यक असते. घाणेरी उपटून, कॉस्मॉस आणि मेक्सिकन सनफ्लॉवर कापून, तर रानमोडी उकरून नष्ट करायला हवी. सध्या ही तणे कापून टाकण्यासाठीची योग्य वेळ आहे. लेखातील वर्णनाच्या क्रमानुसार छायाचित्रामध्ये त्या दाखवल्या आहेत. यांना आपण वाढू देतो, केवळ त्यांची फुले सुंदर आहेत म्हणून. या वनस्पतींच्या सुंदर फुलांमुळे त्यांचा प्रसार करतो. असा प्रसार करण्यापेक्षा यांचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. या वनस्पतींना फुलण्याच्या अगोदरच काढून टाकायला हवे. बियांचा प्रसार रोखण्यापेक्षा, बिया येऊच न देणे चांगले आणि सौंदर्य ते तर स्थानिक वनस्पतीतही आहेच की. आपण ते शोधायला हवे. काळी साल नेसलेल्या चंदनफुलांचे सौंदर्य शोधून तर पाहा! विदेशी वाणापेक्षा कितीतरी सुंदर दिसतील... पण नाही, आम्ही भुलतो... वरलिया रंगा!

संपर्क : ९६७३७८४४१०
vilasshindevs44@gmail.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 AUG 2022
सकाळ

# विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ

## राष्ट्रीय सेवा योजना; उपक्रम, शिबिरासाठी जादा रक्कम

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सक्रिय असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात आली आहे. निवासी शिबिर, विशेष शिबिर आणि नियमित उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचे मानधन वाढवले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आर्थिक भार काही प्रमाणात हलका झाला.

विद्यार्थ्यांत सामाजिक जाणीव निर्माण व्हावी. त्यांच्यावर श्रम संस्कार व्हावेत, यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात करण्यात आली. कोल्हापूर, सांगली आणि सातारा या जिल्ह्यांतील महाविद्यालयांमधील विद्यार्थी दरवर्षी मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होतात. महाविद्यालयांतर्गत विविध उपक्रमांत त्यांचा सहभाग असतोच, याशिवाय वर्षातून एकदा निवासी शिबिर, विशेष शिबिरांचे आयोजन केले जाते. सामाजिक प्रश्नांची माहिती होते. याशिवाय रक्तदान शिबिरे, वृक्षारोपणाचे उपक्रम विद्यार्थी घेतात. शासकीय योजनांचा विविध उपक्रमांतून हे विद्यार्थी अनेक समाजोपयोगी कामे करतात. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन जीवनात युवा मन घडवण्याचे काम करते. त्यांचे मानधन वाढवल्याने आणखी विविध प्रकारचे उपक्रम राबवणे शक्य होणार आहे.

| वाढीव मानधन पुढीलप्रमाणे | | |
|---|---|---|
| कार्यक्रम | २०२०-२०२१ ची रक्कम | २०२२-२३ ची रक्कम |
| नियमित उपक्रम | २५० रु. प्रति विद्यार्थी | ४०० रु. प्रति वर्ष |
| विशेष शिबिर | ४५० रु. प्रति विद्यार्थी | ७०० रु. प्रति वर्ष |

| | | |
|---|---|---|
| प्रशासकीय खर्च | ३० रु. | ४० रु. |
| कार्यक्रम अधिकारी पॉकिट मनी | ४८ रु | ६० रु. |
| अन्य खर्च | १२ रु | २५ रु. |
| कार्यक्रमावरील खर्च | १६० रु | २७५ रु. |
| एकूण | २५० रु | ४०० रु. |
| ७ दिवसीय शिबिर | ४५० (६४.२८ रु. विद्यार्थी, प्रति दिवस)<br>७०० (प्रति विद्यार्थी १००, प्रति दिन) | |

> **विद्यार्थ्यांचे मानधन वाढवावे, ही पूर्वीपासूनची मागणी होती. सर्वसाधारणपणे १ हजार रुपये मानधन होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, जी वाढ झाली आहे तीदेखील समाधानकारक आहे.**
> – **प्रा. अभय जायभाये**, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

### दृष्टिक्षेपात राष्ट्रीय सेवा योजना

- महाविद्यालये ........................ १७८
- विद्यार्थी............................. २६ हजार
- जिल्हा समन्वयक ................. ३
- विभागीय समन्वयक............... २८
- वर्षभरातील निवासी शिबिरे ........ १४०

